**प्रेसनोट दिनांक १२/०४/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलिसींग संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील प्रतिकनगर येथील वसतीगृहातील मुलींना महिला पोलीस अधिकारी यांनी बाल लैंगिक अत्याचार विरोधी कायदा व संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले बाबत**

---

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात राबविण्यात येणारे कम्युनिटी पोलीसींग संकल्पने अंतर्गत श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे, पो.उप.निरी. श्री.विठ्ठल माने, म.पो.शि. ९४९६ अश्विनी गजरमल यांनी दिनांक ०६/०४/२०१९ रोजी सायं. १८:०० वा. ते २१:०० वा. या दरम्यान येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीतील प्रतिकनगर, येरवडा येथील बहुजन हिताय बहुजन सुखाय मुलींचे वसतीगृह या ठिकाणी भेट देऊन, तेथील विद्यार्थीनी/मुलींना व शिक्षक, परिचारक वर्ग यांचेशी सुसंवाद साधून, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच त्यांना बालकांचे संरक्षण तसेच बाल लैंगिक अत्याचार विरोधी कायदा यामधील तरतुदींची देऊन मुलींचे सुरक्षिततेे संदर्भात मार्गदर्शन केले आहे.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील श्री. राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे, पो.उप.निरी.श्री. विठ्ठल माने, म.पो.शि. ९४९६ अश्विनी गजरमल यांनी वरील प्रमाणे उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे




